२५८ २५८
सांकेतांक क्र. 199905192 2

परिपत्रक

क्र.एकत्री/तक्रार/ए-१/९९
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख,म.राज्य यांचे कार्यालय.
नवीन प्रशासकीय इमारत,कौन्सिल हॉल समोर,
पुणे, दिनांक :- १८-५-१९९९.

१०६ २८४ ९८०

19 MAY 1999

विषय :- जमीन एकत्रीकरण योजना
तक्रार अर्ज प्रकरणात क्रमानुसार
कार्यवाही करणे बाबत.

या कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे की, उपसंचालक भूमि अभिलेख/अधीक्षक भूमि अभिलेख/तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांचे कार्यालयात जे तक्रार अर्ज प्राप्त होत असतात त्यावर क्रमानुसार कार्यवाही केली जात नाही. तसेच अधीक्षक भूमि अभिलेख/उपसंचालक भूमि अभिलेख यांचे कार्यालयात तक्रार अर्ज प्रकरणात जे चौकशी अहवाल प्राप्त होतात त्याची सुध्दा क्रमानुसार पडताळणी केली जात नसल्याचे दिसून आले आहे.

२. वरील कारणामुळे पूर्वीचे अर्ज/चौकशी प्रस्ताव कार्यालयात प्रलंबित राहतात व त्यानंतरच्या अर्जावर/चौकशी अहवालावर कार्यवाही होत असते. ही कार्यप्रणाली अयोग्य आहे. सबब यापुढे कार्यालयात प्राप्त झालेल्या अगर होणा-या तक्रारी अर्जावर तसेच चौकशी अहवालावर न चुकता क्रमानुसार कार्यवाही करणेत यावी.

स्वाक्षरी/-xxx
[ अमिताभ चंद्र ]
जमाबंदी आयुक्त आणि
संचालक, भूमि अभिलेख.

प्रत :- आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी अग्रेषित / रवाना :-

१] उपसंचालक भूमि अभिलेख [सर्व]/जमाबंदी उप आयुक्त [सर्व]
२] अधीक्षक भूमि अभिलेख [सर्व]/प्राचार्य भूमि अभिलेख प्रशिक्षण शाळा, औरंगाबाद.
३] तालुका निरीक्षक भूमि अभिलेख [सर्व]
४] कार्यालय अधीक्षक [सर्व]-एकत्रीकरण/भूमापन व नगर भूमापन शाखा.
३३०८ ५] स्वीय सहाय्यक.

अधीक्षक, भूमि अभिलेख
सातारा, यांचे कार्यालय
दाखल ता. २०।५।९९
क्र. ५२
अ. भू. अ. सातारा

"नि र्ग मि त"

जमाबंदी उप आयुक्त.

२८४ १८/५/९९